<u>रोख्र रकमेत देय</u>

<u>अर्थसंकल्पिय अनुदान सन २०१०-२०११</u>

"२२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता-०१ पाणीपुरवठा-००१, संचालन व प्रशासन (०१) (०१) पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय / उपविभागीय आस्थापना (२२१५ १८४३), दत्तमत"

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
शासन निर्णय क्र.जिपआ-२०११/प्र.क्र.१०३/पापु-२३,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक:- २३ मे,२०११

वाचा-१) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. लेख्रानु-२०.११/प्र.क्र.६५/अर्थसंकल्प-३ दिनांक ३१ मार्च,२०११

<u>प्रस्तावना</u>:-

सन २०११-२०१२ चा अर्थसंकल्प दिनांक २३ मार्च,२०११ रोजी विधानमंडळास सादर करण्यात आला. सदर अर्थसंकल्पावर मागणीनिहाय चर्चा होऊन संपूर्ण अर्थसंकल्पास मंजूरी मिळेपर्यंतचा दोन महिन्याचा खर्च भागविण्यासाठी विधानमंडळाने "महाराष्ट्र विनियोजन (लेख्रानुदान) विधेयक, २०११" मंजूर केले आहे. सदर विधेयकाचे अधिनियमात रुपांतर झाले असून ते महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ म्हणून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४ दि.३१ मार्च,२०११ मध्ये प्रसिध्द करण्यात आल्याचे वित्त विभागाने संदर्भाधीन परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे.

२. जिल्हा परिषदेमधील ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या आस्थापनेवरील अधिकारी /कर्मचारी वर्ग-१ व वर्ग-२ यांचे वेतन व इतर ख्रर्च भागविण्यासाठी मागणी क्रमांक वाय-२"२२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता-०१ पाणीपुरवठा-००१, संचालन व प्रशासन (०१) (०१) पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय/उपविभागीय आस्थापना (२२१५ १८४३) (दत्तमय)" या लेख्राशीर्षाख्राली सन २०११-१२ या आर्थिक वर्षासाठी एकूण **रुपये १७,०१,२८,०००/- (अक्षरी रुपये सतरा कोटी एक लक्ष अठ्ठावीस हजार)** तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी ०१ वेतनासाठी **रुपये १६,२४,८७,०००/- (अक्षरी रुपये सोळा कोटी चौवीस लक्ष सत्याऐंशी हजार फक्त)** व ११ देशांतर्गत प्रवास ख्रर्चासाठी **रुपये ७६,४१,०००/- (अक्षरी रुपये श्याहत्तर लक्ष एकेचाळीस हजार फक्त)** इतके अनुदान वित्त विभागाच्या संदर्भाधीन परिपत्रकानुसार आस्थापनाविषयक ख्रर्च भागविण्यासाठी "२२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता-०१ २२१५ १८४३" या लेख्राशीर्षाख्राली मंजूर झालेले लेख्रानुदान संबंधीत कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, सर्व जिल्हा परिषद यांना यांना उपलब्ध करुन देण्याची बाब विचाराधीन आहे.

<u>शासन निर्णय-</u>

सन २०११-२०१२ या वित्तीय "२२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता-०१ पाणीपुरवठा-००१, संचालन व प्रशासन (०१) (०१) पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय/उपविभागीय आस्थापना (२२१५ १८४३) (दत्तमय)", ०१ वेतन व ११ देशांतर्गत प्रवास खर्चासाठी (मागणी क्र.वाय-२)" या लेखाशिर्षाखाली **रुपये १७,०१,२८,०००/- (अक्षरी रुपये सतरा कोटी एक लक्ष अठ्ठावीस हजार)** इतक्या रक्कमेची तरतूद करण्यात आलेली आहे. राज्यातील जिल्हा परिषदांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या रक्कमेमध्ये महागाई भत्त्यामुळे झालेल्या वाढीच्या कारणास्तव वेतनासाठी वाढीव रक्कमेची मागणी जिल्हा परिषदांकडून करण्यात आलेली आहे.

२. वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक लेखानु-२०.११/प्र.क्र.६५/अर्थसंकल्प-३, दिनांक ३१ मार्च,२०११ नुसार सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षातील खर्च भागाविण्यासाठी महाराष्ट्र विधानमंडळाने "महाराष्ट्र विनियोजन विधेयक,२०११" (महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) अधिनियम,२०११ यांच्या अनुसूचिच्या स्तंभ ७ व ८ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रक्कमासह) मंजुर केलेले आहे. सदर विधेयकाचे आता अधिनियमात रुपांतर झालेले असून, ते महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-५ म्हणून महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण, भाग-४, दिनांक ३१ मार्च,२०११ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

३. उपरोक्त अधिनियमानुसार सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अनुदानापैकी ०१ (वेतन) साठी **रुपये १६,२४,८७,०००/- (अक्षरी रुपये सोळा कोटी चौवीस लक्ष सत्याऐंशी हजार फक्त)** व ११ देशांतर्गत प्रवास खर्चासाठी **रुपये ७६,४१,०००/- (अक्षरी रुपये श्याहत्तर लक्ष एकेचाळीस हजार फक्त)** इतके अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे.

त्यापैकी जिल्हा परिषदांनी केलेल्या वेतनावरील वाढीव खर्चाच्या मागणीस अनुसरुन सदर लेखाशिर्षाखाली दिनांक १.४.२०११ ते ३१.५.२०११ या कालावधीचा खर्च भागाविण्०१ (वेतन) साठी रुपये २,७०,८२,०००/- (रुपये दोन कोटी सत्तर लक्ष ब्याऐंशी हजार फक्त) इतक्या रक्कमेच्या लेखाअनुदानाचे वाटप या शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्र-अ मधील स्तंभ क्रमांक ३ मध्ये व लेखाशिर्षाखाली ११ देशांतर्गत प्रवास खर्चासाठी रुपये १२,७४,०००/- (रुपये बारा लक्ष चौऱ्याहत्तर हजार फक्त) इतक्या अनुदानाचे वाटप या शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्र - अ मधील स्तंभ क्रमांक ४ मध्ये दर्शविल्यानुसार संबंधीत कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, यांच्या अधिनस्त मंजुर करण्यात येत आहे.

५. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेले अनुदान शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहिल. या शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्र-अ मधील स्तंभ क्रमांक ३ व ४ मध्ये दर्शविण्यात आलेल्या रकमांपेक्षा अधिक खर्च होणार नाही, याची दक्षता सर्व सबंधीत आहरण व सवितरण अधिकाऱ्यांनी घ्यावी.

७.   या शासन निर्णयाव्दारे मंजूर करण्यात आलेल्या लेखाअनुदानातून होणारा खर्च मागणी क्रमांक वाय-२ "२२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता-०१ पाणीपुरवठा-००१, संचालन व प्रशासन (०१) (०१) पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय/उपविभागीय आस्थापना (२२१५ १८४३) (दत्तमय)", **०१ वेतन, ११ देशांतर्गत प्रवासखर्च** या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो या लेखाशिर्षाखाली सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या लेखाअनुदानातून भागविण्यात यावा.

८.   हा शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक **२०११०५२३१५१८१५००१** हा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

(सु.दे.आंबेकर)
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रति,
विभागीय आयुक्त सर्व
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे.
सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र - १ मुंबई (लेखा परिक्षा) (५ प्रतीसह)
महालेखापाल, महाराष्ट्र - १ मुंबई (लेखा अनुज्ञेयता) (५ प्रतीसह)
महालेखापाल, महाराष्ट्र - २ नागपूर (लेखा परिक्षा) (५ प्रतीसह)
महालेखापाल, महाराष्ट्र - २ नागपूर (लेखा अनुज्ञेयता) (५ प्रतीसह)
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
वित्त विभाग (व्यय-३ व अर्थ-१९)
कार्यासन क्रमांक पापु-०४ व २०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, (५ प्रतीसह)
निवड नस्ती कार्यासन क्रमांक का-२३.

विवरणपत्र-अ

शासन निर्णय पा.पु.व स्व.वि.क्रं.जिपआ-२०११/ प्र.क्र.१०३/पापु-२३, दिनांक २३ मे, २०११ चे सहपत्र

लेखाशिर्ष - २२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता ०१, पाणी पुरवठा, ००१, संचालन व प्रशासन (०१) (०१) पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय/उपविभागीय आस्थापना (२२१५ १८४३) ०१ (वेतन),११ प्रवासखर्च

(रुपये हजारात)

अ.क्र	जिल्हयाचे नांव	सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षामध्ये ०१ एप्रिल,२०११ ते ३१ मे,२०११ या कालावधीसाठी मुक्त करण्यात आलेले अनुदान			
		उपलेखाशीर्ष ०१ वेतन	उपलेखाशीर्ष ११ प्रवासखर्च	लेखाशीर्ष २२१५ १८४३ खाली वितरीत करण्यात येत असलेली रक्कम एकूण आकमांक (३+४)	लेखाशीर्ष २२१५ १८४३ खाली वितरीत करण्यात येत असलेली एकूण रक्कम (अक्षरी रुपये)
१	२	३	४	५	६
१	ठाणे	१०००	४०	१०४०	(अक्षरी रुपये दहा लक्ष चाळीस हजार फक्त)
२	रायगड	१६७	३५	२०२	(अक्षरी रुपये दोन लक्ष दोन हजार फक्त)
३	रत्नागिरी	१०००	४०	१०४०	(अक्षरी रुपये दहा लक्ष चाळीस हजार फक्त)
४	सिंधुदुर्ग	१०२०	३०	१०५०	(अक्षरी रुपये दहा लक्ष पन्नास हजार फक्त)
५	नाशिक	१०००	७५	१०७५	(अक्षरी रुपये दहा लक्ष पंच्याहत्तर हजार फक्त)
६	धुळे	५८३	३५	६१८	(अक्षरी रुपये सहा लक्ष अठरा हजार फक्त)
७	नंदुरबार	६५०	३०	६८०	(अक्षरी रुपये सहा लक्ष ऐंशी हजार फक्त)
८	जळगांव	१०००	४५	१०४५	(अक्षरी रुपये दहा लक्ष पंचेचाळीस हजार फक्त)
९	अहमदनगर	६५०	३०	६८०	(अक्षरी रुपये सहा लक्ष ऐंशी हजार फक्त)
१०	पुणे	१०९७	४५	११४२	(अक्षरी रुपये अकरा लक्ष बेचाळीस हजार फक्त)
११	सातारा	११००	५०	११५०	(अक्षरी रुपये अकरा लक्ष पन्नास हजार फक्त)
१२	सांगली	१०००	३०	१०३०	(अक्षरी रुपये दहा लक्ष तीस हजार फक्त)
१३	सोलापूर	१०००	५०	१०५०	(अक्षरी रुपये दहा लक्ष पन्नास हजार फक्त)
१४	कोल्हापूर	८९७	२९	९२६	(अक्षरी रुपये नऊ लक्ष सहवीस हजार फक्त)
१५	औरंगाबाद	६५०	३०	६८०	(अक्षरी रुपये सहा लक्ष ऐंशी हजार फक्त)
१६	जालना	८००	६०	८६०	(अक्षरी रुपये आठ लक्ष साठ हजार फक्त)
१७	परभणी	७१५	३०	७४५	(अक्षरी रुपये सात लक्ष पंचेचाळीस हजार फक्त)
१८	हिंगोली	६०२	५०	६५२	(अक्षरी रुपये सहा लक्ष बावन्न हजार फक्त)
१९	बीड	७१७	५०	७६७	(अक्षरी रुपये सात लक्ष सदुसष्ट हजार फक्त)
२०	नांदेड	१०००	५०	१०५०	(अक्षरी रुपये दहा लक्ष पन्नास हजार फक्त)
२१	उस्मानाबाद	६५०	३०	६८०	(अक्षरी रुपये सहा लक्ष ऐंशी हजार फक्त)
२२	लातूर	६५०	३०	६८०	(अक्षरी रुपये सहा लक्ष ऐंशी हजार फक्त)
२३	बुलढाणा	६५०	३०	६८०	(अक्षरी रुपये सहा लक्ष ऐंशी हजार फक्त)
२४	अकोला	८८३	३५	९१८	(अक्षरी रुपये नऊ लक्ष अठरा हजार फक्त)
२५	वाशिम	१०००	२५	१०२५	(अक्षरी रुपये दहा लक्ष पंचवीस हजार फक्त)
२६	अमरावती	१०००	५०	१०५०	(अक्षरी रुपये दहा लक्ष पन्नास हजार फक्त)
२७	यवतमाळ	७००	३०	७३०	(अक्षरी रुपये सात लक्ष तीस हजार फक्त)
२८	वर्धा	७००	३०	७३०	(अक्षरी रुपये सात लक्ष तीस हजार फक्त)
२९	नागपूर	१०००	३०	१०३०	(अक्षरी रुपये दहा लक्ष तीस हजार फक्त)
३०	भंडारा	९१७	६०	९७७	(अक्षरी रुपये नऊ लक्ष सत्त्याहत्तर हजार फक्त)
३१	गोंदिया	७००	३०	७३०	(अक्षरी रुपये सात लक्ष तीस हजार फक्त)
३२	चंद्रपूर	८८४	३०	९१४	(अक्षरी रुपये नऊ लक्ष चौदा हजार फक्त)
३३	गडचिरोली	७००	३०	७३०	(अक्षरी रुपये सात लक्ष तीस हजार फक्त)
	एकूण	२७०८२	१२७४	२८३५६	(अक्षरी रुपये दोन कोटी त्र्याऐंशी लक्ष छप्पन्न हजार फक्त)

सही/-

(सु.दे.आंबेकर)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

E:\Year २०११\Budject २०११\C.R.१०३-२०१०(२२१५-१८४३\GR dt..doc